## थोडक्यात महत्त्वाचे



पिलीव : येथील परिसराची स्वच्छता करताना सेवेकरी.

### पिलीव येथील स्वच्छता मोहिमेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**पिलीव :** डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा तालुका अलिबाग जिल्हा रत्नागिरी यांच्या वतीने पिलीव येथे ज्येष्ठ निरूपणकार व समाज प्रबोधनकार महाराष्ट्र भूषण डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त सुरू असलेल्या स्वच्छता अभियानाच्या अनुषंगाने स्वच्छता मोहिमेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पिलीव परिसरातील असंख्य सदस्य स्वयंस्फूर्तीने स्वच्छतेच्या कामांमध्ये मग्न होऊन ज्या ठिकाणी घाणीचे साम्राज्य निर्माण होऊ पाहत होते. त्या ठिकाणी खोऱ्या, पाटी, खराटे यांच्या साह्याने स्वच्छता करून रस्ते चकाचक केले.

### बागेचीवाडीतील ज्येष्ठ नागरिकांना मोफत अष्टविनायक दर्शन यात्रा

**अकलूज :** बागेचीवाडी गावातील युवा उद्योजक कोकण माती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश गायकवाड यांनी ज्येष्ठ नागरिकासाठी मोफत अष्टविनायक दर्शन यात्रेचे आयाजन करण्यात आले आहे.



प्रकाश गायकवाड हे मुळचे बागेवाडी (ता.माळशिरस) येथील रहिवासी असले तरी ते कोकण विभागात उद्योग व्यवसाय निमित्ताने शहरात वास्तव्यास आहेत. तरीही ते आपल्या गावातील सर्वांच्या कायम संपर्कात असतात. गावातील सर्वांना ते अडीअडचणीत गरजूंना सढळ हाताने मदत करीत असतात. गावातील तरूणांनी कसल्याही व्यसनाच्या आहारी जाऊ नये, याबाबत ते सतत आग्रही असतात. तसेच त्यांनी आपल्या उद्योगांमध्ये आपल्या गावातील गरजू तरूणांना रोजगार उपलब्ध करून दिले आहेत. गावातील कोणत्याही उत्सवात ते सक्रिय सहभाग घेतात. त्यांच्या संकल्पनेतूनच गावातील ज्येष्ठ नागरिकांना मोफत अष्टविनायक दर्शन यात्रा आयोजित केली आहे.

# मॉर्निंग वॉकला जाताना सतर्कता बाळगा

## मॉर्निंग वॉक बेततोय अनेकांच्या जीवावर : वॉक करताना वाहनांकडे दुर्लक्ष नकोच : सतर्कतेमुळेच अपघाताचे प्रमाण होईल कमी

**दादासाहेब कदम**
पंढरपूर

सध्याच्या धकाधकीच्या जीवनामध्ये व्यायाम करून आपले आरोग्य सदृढ राहण्यासाठी अनेकजण पहाटे चालण्यासाठी घराबाहेर पडतात. नेमके याचवेळी अपघात होऊन अनुचित प्रकार घडल्याच्या अनेक घटना घडत आहेत. यामध्ये चालणाऱ्या व्यक्तीच्या किंवा वाहन चालवणाऱ्या चालकाच्याही चुका असतात. परंतु दोन्ही बाजूंनी सतर्कता बाळगल्यास अशा घटनांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी होईल यात शंकाच नाही.

सर्व प्रथम सावध व्हा, मगच चला... अनेक वेळा उठायला उशीर झाल्यानंतर गडबडीने उठून तसेच चालायला आपण जातो. अशावेळी आपल्या डोळ्यात अजून झोप असल्याने चालण्यामध्ये आपल्या हातून चुका होऊ शकतात. तर हाच प्रकार चालकाच्या बाबतीमध्येही होऊ शकतो. कारण रात्रभर गाडी चालवून त्यास डुलकी लागू शकते, अथवा झोपेतून उठून लगेचच गाडी चालवण्यासाठी बसल्यानंतर चालक पूर्णपणे सावध झालेला नसतो. अशाप्रकारे चुका होऊ नये म्हणून मॉर्निंग वॉकला जाण्यापूर्वी पूर्णपणे सावध व्हा. चालकानेही याची काळजी घेऊनच वाहन चालविण्यास हाती घेतले पाहिजे.





**रस्त्यापेक्षा ग्राउंडचा वापर करावा**

मॉर्निंग वॉकसाठी रस्त्याचा वापर करण्यापेक्षा ग्राउंडचा वापर केल्यास अपघाताचा प्रश्न उद्भवणार नाही. तर रस्त्यावर प्रदूषणयुक्त हवेमध्ये फिरण्यापेक्षा ग्राउंडवरील निसर्गरम्य हवेमध्ये फिरल्याचा त्याचा आरोग्यासाठी अधिक सकारात्मक परिणाम होऊ शकतो. यामुळे खऱ्या अर्थाने मॉर्निंग वॉक सार्थकी लागणार आहे.

**ठळक दिसणारे कपडे वापरावेत**

मॉर्निंग वॉकला जाताना कपडे खराब होतील, या भीतीपोटी मळकट कपडे नेहमीच वापरले जातात. परंतु हे कपडे घातल्याने पहाटेच्या अंधारामध्ये वॉकिंग करणारी व्यक्ती दिसून येत नाही. त्यामुळेही अपघात होतात. परंतु मॉर्निंग वॉकला जाताना वाहनांच्या प्रकाशामध्ये उजाळून दिसतील, अशा प्रकारचे कपडे वापरल्यास वाहन चालकाला व्यक्ती नजरेस पडण्यास मदत होणार आहे.

**वॉकला जाताना हेडफोन वापरूच नये**



मॉर्निंग वॉकसाठी जाताना हेडफोन कानामध्ये लावून गाणी ऐकत वॉकिंग करण्याची सध्या स्टाईल झाली आहे. रस्त्याने वॉकिंग करताना कानामध्ये हेडफोन असल्याने मागून आलेल्या वाहनाचा आवाज न आल्याने अपघात होतात. तर कानामध्ये हेडफोन घालून गाण्याच्या तंद्रीमध्ये गाडी चालविणे हे धोकादायक आहे. त्यामुळे वाहन चालकाचे नियंत्रण सुटल्याने अनेक अपघात झालेले आहेत. मॉर्निंग वॉक करून झाल्यानंतर निवांत कालावधीमध्ये गाण्याचा आस्वाद घेतल्यास तो आनंद द्विगुणीत तर होईलच परंतु या कारणामुळे होणारे अपघात टळतील, असा दुहेरी फायदा होईल.

**प्रकाशमान परिसरातच करा मॉर्निंग वॉक**

सकाळी चालण्यासाठी जात असताना आपण वाहन चालकांना व्यवस्थित दिसू याची खात्री करूनच मॉर्निंगवाक करावे. ज्या परिसरामध्ये प्रकाश आहे त्याच परिसरामध्ये मॉर्निंग वॉकसाठी जावे. अनेकवेळा भल्या पहाटे मॉर्निंग वॉकला जाताना अंधारामुळे वाहन चालकास व्यक्ती न दिसल्याने अपघात होण्याचे प्रकार जास्त आहेत. यामध्ये मॉर्निंग वॉकसाठी जाणाऱ्यांनी प्रकाश असणारा परिसर मॉर्निंग वॉकसाठी निवडावा. तर वाहतूक नियमानुसार वाहनालाही प्रमाणशीर प्रकाश असला पाहिजे. अनेकवेळा एक लाईट असणारी वाहने, लाईट बंद असलेली वाहन चालविण्यात आल्याने अपघात घडलेले आहेत.

# उपसा सिंचन योजनेस मुख्यमंत्र्यांची पूर्व मान्यता

## सांगोला तालुक्यासाठी २ टीएमसी पाणी मिळणार : आ. शहाजीबापू पाटील यांची माहिती

**तालुका प्रतिनिधी**
सांगोला

बहुचर्चित स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन (उजनी उचल पाणी) योजनेस शासन निर्णयाच्या निर्देशानुसार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून पूर्व मान्यता मिळाली आहे. येत्या महिन्याभराच्या काळात या योजनेच्या कामाचे भूमिपूजन होणार आहे. त्यामुळे गेल्या २५ वर्षांपासून रखडलेल्या उजनीचे २ टीएमसी उचल पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाल्याने सांगोला तालुक्यातील वंचित असलेल्या १६ गावातील शेतीच्या जिव्हाळ्याचा पाणी प्रश्न मार्गी लागणार आहे. या निर्णयामुळे हा भाग सुजलाम् सुफलाम् होणार असल्याचे आमदार शहाजी बापू पाटील यांनी सांगितले.

शिंदे फडणवीस सरकारने दुष्काळी १३ तालुक्यातील रखडलेल्या सिंचन योजना मार्गी लावण्याचा घेतलेल्या निर्णयापैकी उजनी उपसा सिंचन योजनेला स्व. बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना सांगोला नाव देऊन यापूर्वीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी मागणी पूर्ण केली. दरम्यान आ. शहाजीबापू पाटील यांनी कार्यकारी संचालक महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे यांच्याकडे या योजनेस मुख्यमंत्री यांची मान्यता मिळण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर केला होता. याप्रस्तावाची दखल घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या योजनेस पूर्व मान्यता दिल्याचे शासनाचे उपसचिव प्रसाद नार्वेकर यांनी लेखी पत्राद्वारे कळविले आहे त्यामुळे या योजनेचा पुढील प्रशासकीय मान्यतेचा मार्ग मोकळा झाला आहे. सदर प्रलंबित उजनी उपसा सिंचन योजनेचे काम तातडीने मार्गी लावण्यासाठी खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी मदत केल्याचे आ. पाटील यांनी सांगितले.

**मान्यता मिळताच प्रत्यक्ष कामास सुरुवात**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सत्ता परिवर्तनानंतर सांगोला तालुक्यातील सिंचन योजनेसह विविध विकास कामांना निधी कमी पडू दिला जाणार नाही, हा मला दिलेला शब्द पाळून उजनी २ टीएमसी उचल पाणी योजनेस पूर्व मान्यता दिली आहे. त्यामुळे मी अत्यंत समाधानी आहे. येत्या १० दिवसात प्रशासकीय मान्यता मिळताच योजनेच्या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामास सुरुवात होणार आहे.

**–आमदार शहाजी बापू पाटील**

# पंढरपुरात ३० जुलैपासून श्रीमद् भागवत कथेचे आयोजन

**प्रतिनिधी**
पंढरपूर

अधिकमास हा पुरूषोत्तम मास म्हणून ओळखला जातो. या महिन्यात निष्काम भावनेने सत्कर्म करायचे असते. विशेषतः भगवान श्रीकृष्णाचे नामस्मरण होणे आवश्यक असते. मृम्हणून पंढरपुरात श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे.

सुप्रसिद्ध भागवताचार्य सदगुरू मुकुंदराज महाराज सोनगीरकर यांचे भागवत कथेचे आयोजन गया मातोश्री मनमाडकर मठ येथे ३० जुलै ते ५ ऑगस्ट या कालावधीत करण्यात आले आहे. कथेची वेळ सकाळी ९.३० ते १२.३० तर दुपारी ४.३० ते ७.३० वाजता ठेवण्यात आली आहे. कुलकर्णी म्हणाले, मुकुंदराज महाराज यांचे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात असलेले भक्तगण सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.


**Special Recovery Officer**
**The Laxmi Co-operative Bank Ltd. Solapur**
**(Under Liquidation)**
**Head Office: 319, South Kasba, Solapur**

**Form 'Z'**
**(See Sub rule 11(d-I) 2) of rule 107)**
**POSSESSION NOTICE FOR IMMOVABLE PROPERTY**

Whereas the undersigned being the Recovery Officer Of **The Laxmi Co Op Bank Ltd.Solapur under liquidation** the Maharashtra Co-op.Societies Rule 1961 a demand notice dated **08-06-2016** calling upon the judgment Debtor **1.Sai Imitation Jwellery Prop. Poonam Rajan Habib, 2. Rajesh Madhukar Tikale, 3. Rajdatta Sidram Rasolagikar** to repay the amount mentioned in the notice being **Rs.1,77,129/- (Rupees in words One Lakh Seventy Seven Thousand One Hundred Twenty Nine Only)+ Interest from Dt.09.06.2016**, with dated of the receipt of the said notice and the judgment Debtor having failed to repay the amount, Notice is hereby given to the judgment Debtor and the public in general that the undersigned has taken symbolic possession on **17-07-2023** of the property described herein below in exercise of powers conferred on him under Rule 107{11-(d-1)} of the **Maharashtra Co-Op. Societies Rules 1961, as Rajesh Madhukar Tikale** has refused to hand over actual peaceful possession to undersigned Recovery Officer.
The Judgment Debtor in particular and the public in general is hereby cautioned not to deal with the property and any dealings with the property will be subject to the charge of the **The Laxmi Co-Op Bank Ltd Solapur under liquidation** for an amount **1,77,129/- (Rupees in words - One Lakh Seventy Seven Thousand One Hundred Twenty Nine Only) as on 08-06-2016** and interest, charges. Surcharges etc.thereon.

**DESCRIPTION OF PROPERTY**

All that piece & Parcel of land and building situate within Dist.& Sub District Solapur.Tal North Solapur. Out of Solapur Muncipal Corporation, at kasbe solapur Gat No.143/3/ plot no. 333, area of 73.64 sqmts. & the area bounded by :
**East :** Plot No **South :** Plot No
**West :** Road **North :** Road
**(This Property is belonging to Rajesh Madhukar Tikale)**

Date : 17/07/2023
Place : Solapur

Acknowledged by borrower
**Name of Borrower's**
1. Sai Imitation Jwellery Prop.Poonam Rajan Habib.
2. Rajesh Madhukar Tikale
3. Rajdatta Sidram Rasolagikar

Sign/-
**Bhimashankar Anaveer Batgeri**
**Special Recovery Officer**
**The Laxmi Co-operative Bank Ltd. Solapur**
**(Under Liquidation)**


# शिवसेनेच्या आरोग्य शिबिराने मोडले सर्व विक्रम

## तब्बल १७ हजार ९ जणांची झाली आरोग्य तपासणी : चक्क पोलीस उपायुक्त बनल्या डॉक्टर

**प्रतिनिधी**
सोलापूर

शिवसेनेच्या वतीने बुधवारी सतनाम चौक येथे झालेल्या आरोग्य शिबिराने सर्व विक्रम मोडले. या शिबिरात तब्बल १७ हजार ९ जणांची तपासणी करुन औषधोपचार करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून आलेल्या पोलीस उपायुक्त आणि वैद्यकीय शिक्षण पूर्ण केलेल्या डॉ. दिपाली काळे यांनीही काही रुग्णांची तपासणी करुन कामगारांना सुखद धक्का दिला.



सोलापूर : शिवसेनेच्या महाआरोग्य शिबिरात रुग्णांची झालेली गर्दी.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी पोलीस उपायुक्त डॉ. दीपाली काळे, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, आरोग्य विभागाचे उपसंचालक राधाकृष्ण पवार, सोलापूर महानगपालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. बसवराज लोहारे, सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मनीष केत, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, शहर समन्वयक दिलीप कोल्हे, संयोजिका आणि शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या प्रा. डॉ. ज्योती वाघमारे, उपजिल्हाप्रमुख हरिभाऊ चौगुले तुकाराम मस्के, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख संयोजक प्रियदर्शन साठे, मोची समाजाचे विभागीय अध्यक्ष करेप्पा जंगम, मोची समाजाचे अध्यक्ष विजय मरेड्डी उपस्थित होते. शिबिरात मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी तपासणी, नेत्र तपासणी, मोफत चष्मे वाटप, बालरोग तपासणी, विविध आजारांची तपासणी करण्यात आल्या. अभिषेक म्हेत्रे, मोहन जंगम, लखन म्हेत्रे, मच्छिंद्र लोकेकर, अर्जुन शिवसिंगवाले आदींनी परिश्रम घेतले. अभिजीत भंडारे यांनी प्रास्ताविक केले. ऐश्वर्या हिबारे यांनी सूत्रसंचालन तर विजय मरेड्डी यांनी आभार प्रदर्शन केले.

**कामगारांची झाली सोय**

गेल्या ४० वर्षांपासून आम्ही सतनाम चौक परिसरात राहतो. परंतु इतके मोठे शिबीर येथे प्रथमच झाले आहे. ६० प्रकारच्या तपासण्या आणि औषधे शिवसेनेने एकाच छताखाली उपलब्ध करून दिल्याने कामगारांची चांगली सोय झाली आहे.

**–अर्चना लिंगराज,** नागरिक


## हरवले आहे

आमच्या गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जनमंगल प्रतिष्ठान, सोलापूर या न्यासाचे नोंदणी प्रमाणपत्र क्र. ए - ६२, सोलापूर संस्थेच्या बाळीवेस येथील इमारतीचे बांधकाम करताना साहित्य स्थलांतरीत करताना गहाळ झाले आहे. त्याबाबत रितसर तक्रार मा. पोलीस निरीक्षक सो., फौजदार चावडी पोलीस स्टेशन, सोलापूर येथे नोंद केली असून, सदर प्रमाणपत्र कोणास मिळाले असतील ते खालील पत्यावर देण्याची विनंती आहे.

**गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जनमंगल प्रतिष्ठान, सोलापूर**
अध्यक्ष,
**श्री. संजय शरदचंद्र गांधी,**
१३ बुधवार पेठ, बाळी वेस, सोलापूर
मो.क्र. ९३७०४०४५४६.

सही/-
**अध्यक्ष**
**गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जनमंगल प्रतिष्ठान बाळीवेस, सोलापूर**

**IndoStar Home Finance Private Limited**
**Regd. Office: -** Unit No. 305, 3rd Floor, Wing 2/E, Corporate Avenue, Andheri- Ghatkopar Link Road, Chakala, Andheri (East), Mumbai – 400093
**CIN :** U65990MH2016PTC271587 **Tel:** +91 22 45107701
**Email:** contact@indostarhfc.com; **Website:** www.indostarhfc.com

**सूचना**

मास्टर डायरेक्शन– नॉन–बँकिंग फायनान्शियल कंपनी हाऊसिंग फायनान्स कंपनी (रिझर्व्ह बँक) निर्देश, २०२१ च्या परिच्छेद ९३ नुसार याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनीचे शाखा कार्यालय **४ बी, अक्षय कॉम्प्लेक्स, भागवत पेट्रोल पंप, शिवाजी चौकाच्या मागे, सोलापूर, महाराष्ट्र – ४१३००१** येथे स्थित आहे, ते **२५ ऑक्टोबर २०२३** च्या कामकाजाच्या वेळेच्या समाप्तीपासून बंद होईल. कंपनीचे कामकाज **एस क्रमांक २०३, कार्यालय क्रमांक – १, पहिला मजला, मंत्री चांडक आयकॉन, सात रस्ता सोलापूर, महाराष्ट्र – ४१३००१** येथे असलेल्या जवळच्या शाखा कार्यालयात स्थलांतरित केले जात आहे. कोणत्याही सहाय्याची आवश्यकता असल्यास, तुम्ही वर नमूद केल्याप्रमाणे जवळच्या शाखा कार्यालयाशी संपर्क साधू शकता किंवा contact@indostarhfc.com वर ईमेल पाठवू शकता.
ही सूचना कंपनीच्या वेबसाइटवर (www.indostarhfc.com) पाहिली जाऊ शकते.

**इंडोस्टार होम फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड** साठी
सही/-
**निधी सदानी**
**कंपनी सचिव**

दिनांक: २६-०७-२०२३


# जे पुढाऱ्यांना जमले नाही ते महिलांनी केले

## तीन हजार वृक्षारोपण करून वैराग परिसराचे केले नंदनवन

**प्रतिनिधी**
वैराग

एक संस्था....माझं गाव माझं प्रतिष्ठान. महिला सदस्य सुमारे सातशे. एकीचं बळ काय असत ते या रणरागिनींनी दाखवलं. तीन हजार रोपांचे अनेक ठिकाणी वृक्षारोपण करत वैराग शहर परिसर हिरवागार केला.

कामे मिळवून ते बोगस करायची अनू रग्गड पैसा मिळवण्यात पुढाऱ्यांचा हात कोणी धरू शकत नाही. पैसा मिळत असेल तर प्रसंगी सत्ता मिळवताना कट्टर विरोधक असले तरी मिलीभगत करत गुप्त सुप्त एकत्र नांदताना अनेक ठिकाणी दिसून येते. यामुळे तू पण बोगस काम कर मी पण करतो, कोणीच कोणाला विरोध करायचा नाही. सर्रास असा प्रकार चालतो व वैरागमध्ये तर जाणवतो. गतवर्षी सोलापूर–बार्शी महामार्गाचे नूतनीकरण करण्यात आले. यामध्ये वैराग शहरात सुमारे चार किलोमीटर चारपदरी रस्ता करून रस्ता दुभाजक बनवला आहे. या दुभाजकामध्ये दीड फुटाची चारी ठेवली आहे. मात्र, लाखो, कोटी रुपये मिळवणाऱ्या अवताडे कन्स्ट्रक्शनच्या ठेकेदाराने त्यात झाडे लावायची दानत दाखवली न नगरपंचायतने. गावाला शोभा आणयची तसदी घेतली ना नगरपंचायतीच्या कामासाठी धडपडणाऱ्या कोणा पुढाऱ्यांना शहराचे किंवा समाजाचे देण लागतेय याची आठवण झाली नाही. आणि याच उद्वेगातून माझ गाव माझ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या सुमारे सातशे महिलांनी एकत्रित येऊन रस्त्याची स्वच्छता करून या जागेत मलिदा खावून लठ्ठ होऊन झोपेचे सोंग घेतलेल्यांना जागे करण्यासाठी ढोल, हलग्या, डॉल्बी लावून वाजतगाजत येऊन वृक्षारोपण केले. सवंग प्रसिद्धीसाठी धडपडणाऱ्या आणि पैशासाठी हपापलेल्या पुढाऱ्यांना, ठेकेदारांना एक प्रकारे चपराकच लगावली आहे.



वैराग : वृक्षारोपण करण्यासाठी आलेल्या माझं गाव माझं प्रतिष्ठानच्या महिला सदस्या.

**समाजकारण एवढाच उद्देश**

सर्वसामान्यांना राजकारणाला कंटाळली असून आम्ही काही प्रतिष्ठितांनी समाजाचे आपण देणं लागतो या भावनेतून ही स्थापना राजकारण विरहित केली आहे. यातून फक्त समाजाकारण एवढाच उद्देश आहे. याचाच भाग म्हणून हे केलेले वृक्षारोपण आहे.

या महावृक्षारोपणामध्ये आबाल वृद्धांपर्यंत सर्वांचा सहभाग राहिला. तत्पूर्वी ग्रामदैवत श्री सच्चिदानंद संतनाथ महाराजांची आरती करून मंदिरापासून वृक्षारोपणाच्या रॅलीला सुरुवात झाली. ही रॅली केसरी चौक, गांधी चौक, आझाद चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून वृक्षारोपण करत निघाली.

विशेष म्हणजे आपण हिरवळ तयार करणार आहोत या पार्श्वभूमीवर सर्व महिलांनी हिरव्या रंगाची साडी परिधान केलेली होती. माझं गाव प्रतिष्ठान हे टायटल गाणे रॅलीत नवचैतन्य निर्माण करत होते. यावेळी प्रतिष्ठानचे प्राध्यापक चंद्रकांत खेंदाड यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला तर अहमदनगरच्या उपवनसंरक्षक सुवर्णा माने व धाराशीव जिल्हा कृषी अधिकारी रवींद्र माने यांनी हायवेच्या दुभाजकामध्ये वृक्षारोपण केले. याप्रसंगी सुमारे ७०० महिला व २०० पुरुष उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. या कार्यक्रमास प्रा. चंद्रकांत खेंदाड, डॉ. पोपट काळे, दिगंबर भडोळे, शैलेंद्र गायकवाड, दत्तात्रय उंडाळे, प्रणित गांधी, अतुल मलमे, कविता सोपल, डॉ. संगीता देशमुख, डॉ. सई गुंड, सुजाता नवले, सीमा गांधी, नीता खेंदाड, सुलभा मगर, अरुणा रेळेकर, अरुणा गीते, रूपाली खेंदाड, मंजूषा गरड, शुभांगी पांढरमिसे, आयशा पठाण, पल्लवी माने, आरती गांधी, सारंगा गांधी, संगीता गांधी, दीपा माने, विद्या जंगले, रूपाली जंगले, डॉ. सई गुंड आदी उपस्थित होते. तर बापू वायकर, रावण चव्हाण, नाना बंडेवार, अजय घोडके, सोनू लोहार, श्याम मगर, दादा देशमुख, प्रताप खेंदाड तसेच वैराग नगरपंचायत, धननिरंकारी मंडळ, श्री अंबिका योग कुटीर यांचे सहकार्य लाभले.


**Special Recovery Officer**
**The Laxmi Co-operative Bank Ltd. Solapur**
**(Under Liquidation)**
**Head Office: 319, South Kasba, Solapur**

**Form 'Z'**
**(See Sub rule 11(d-I) 2) of rule 107)**
**POSSESSION NOTICE FOR IMMOVABLE PROPERTY**

Whereas the undersigned being the Recovery Officer Of **The Laxmi Co Op Bank Ltd.Solapur under liquidation** the Maharashtra Co-op. Societies Rule 1961 a demand notice dated **23.03.2017 & 29-05-2023** calling upon the judgment Debtor **1.Shoukat A.Rahim Sangram 2.Ruksana Begam A.Rahim Sangram 3.Gani Imam Bagwan 4. Mahadev Vithoba Gaikwad** to repay the amount mentioned in the notice being **Rs.5,18,295/- (in words Five Lakh Eighteen Thousand Two Hundred Ninty Five Only)+ Interest from Dt. 30-05-2023,**with dated of the receipt of the said notice and the judgment Debtor having failed to repay the amount, Notice is hereby given to the judgment Debtor and the public in general that the undersigned has taken symbolic possession on **19-07-2023** of the property described herein below in exercise of powers conferred on him under Rule 107{11-(d-1)) of the **Maharashtra Co-Op.Societies Rules 1961, as Ruksana begam A.Rahim Sangram** has refused to hand over actual peaceful possession to undersigned Recovery Officer.
The Judgment Debtor in particular and the public in general is hereby cautioned not to deal with the property and any dealings with the property will be subject to the charge of the **The Laxmi Co-Op Bank Ltd Solapur under liquidation** for an amount **Rs. 5,18,295/- (in words Five Lakh Eighteen Thousand Two Hundred Ninty Five Only) as on 29-05-2023** and interest, charges.Surcharges etc. thereon.

**DESCRIPTION OF PROPERTY**

All that piece & Parcel of land and building situate within Dist.& Sub District Solapur.Tal North Solapur. Out of Solapur Muncipal Corporation, at Majarewadi, Gat No.52/2A/Plot No.11area 1.94.47 sqmts.
& the area bounded by:
**East :** Zakir Shekh Property **South :** Sumayya School
**West :** Dilbar Hall **North :** Road
**(This Property is belonging to Ruksana begam A.Rahim Sangram)**

Date : 19/07/2023
Place : Solapur

Acknowledged by borrower
**Name of Borrower's**
1. Shoukat A.Rahim Sangram
2. Ruksana begam A.Rahim Sangram
3.Gani Imam Bagwan
4.Mahadev Vithoba Gaikwad

Sign/-
**Shankar Shrimantrao Kharatmal**
**Special Recovery Officer**
**The Laxmi Co-operative Bank Ltd. Solapur**
**(Under Liquidation)**

**Special Recovery Officer**
**The Laxmi Co-operative Bank Ltd. Solapur**
**(Under Liquidation)**
**Head Office: 319, South Kasba, Solapur**

**Form 'Z'**
**(See Sub rule 11(d-I) 2) of rule 107)**
**POSSESSION NOTICE FOR IMMOVABLE PROPERTY**

Whereas the undersigned being the Recovery Officer Of **The Laxmi Co Op Bank Ltd.Solapur under liquidation** the Maharashtra Co-op. Societies Rule 1961 a demand notice dated **10-12-2020** calling upon the judgment Debtor **1.Rajesh Siddharam Hele 2.Santosh Suresh Anikhindi 3.Vijay Laxman Patange 4.Bhagyashri Yuvraj Chumbalkar** to repay the amount mentioned in the notice being **Rs.29,10,699/- (in words Twenty Nine Lakh Ten Thousand Six Hundred Ninty Nine Only)+ Interest from Dt.11-12- 2020**,with dated of the receipt of the said notice and the judgment Debtor having failed to repay the amount, Notice is hereby given to the judgment Debtor and the public in general that the undersigned has taken symbolic possession on **18-07-2023** of the property described herein below in exercise of powers conferred on him under Rule 107{11-(d-1)} of the **Maharashtra Co-Op.Societies Rules 1961, as Rajesh Siddharam Hele** has refused to hand over actual peaceful possession to undersigned Recovery Officer.
The Judgment Debtor in particular and the public in general is hereby cautioned not to deal with the property and any dealings with the property will be subject to the charge of the **The Laxmi Co-Op Bank Ltd Solapur under liquidation** for an amount **Rs. 29,10,699/- (in words Twenty Nine Lakh Ten Thousand Six Hundred Ninty Nine Only) as on 10-12-2020** and interest, charges.Surcharges etc. thereon.

**DESCRIPTION OF PROPERTY**

All that piece & Parcel of land and building situate within Dist.& Sub District Solapur.Tal North Solapur. Out of Solapur Muncipal Corporation, at Majarewadi, Gat No.75/3 Duplex No.6 C area of 0.94.66 sqmts.
& the area bounded by:
**East :** Road **South :** Road
**West :** Bhagwan Rampure Property **North :** Kumthe Road
**(This Property is belonging to Rajesh Siddharam Hele)**

Date : 18/07/2023
Place : Solapur

Acknowledged by borrower
**Name of Borrower's**
1. Rajesh Siddharam Hele
2. Santosh Suresh Anikhindi
3. Vijay Laxman Patange
4. Bhagyashri Yuvraj Chumbalkar

Sign/-
**Bhimashankar Anaveer Batgeri**
**Special Recovery Officer**
**The Laxmi Co-operative Bank Ltd. Solapur**
**(Under Liquidation)**